अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि. ०६ नोव्हेंबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ३९ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८


## दक्षिण आफ्रिकेचा ८३ धावांत खुर्दा, भारताचा २४३ धावांनी विजय



**कोलकात्ता :** भारताने विश्वचषकात सलग आठव्या विजयाची नोंद केली. कोलकात्याच्या ईडनगार्डन मैदानावर भारताने दक्षिण आफ्रिकेचा २४३ धावांनी विराट पराभव केला. रवींद्र जाडेजाने अष्टपैलू कामगिरी केली.

फलंदाजी करताना त्याने जबराट फिनिशिंग केले. त्यानंतर गोलंदाजीत त्याने पाच विकेट्स घेतल्या. विराट कोहलीने ४९ वे वनडे शतक ठोकले. श्रेयस अय्यरने अर्धशतकही ठोकले.कोहलीला सामनावीर पुरस्काराने गौरविले. भारताने दिलेल्या ३२६ धावांच्या विराट आव्हानाचा पाठलाग करताना आफ्रिकेची सुरुवात अतिशय खराब झाली. फॉर्मातील क्विंटन डिकॉक अवघ्या पाच धावांवर तंबूत परतला. मोहम्मद सिराजने त्याला त्रिफळाचीत बाद केले. त्यानंतर आफ्रिकेची फलंदाजी ढेपाळली. ४० धावांवर आफ्रिकेचे पाच फलंदाज तंबूत परतले.जाडेजा, शर्मींच्या माऱ्यापुढे आफ्रिकेने गुडघे टेकले. टेम्बा बवुमाने ११ धावा जोडल्या. रासी डुसेनने १३ धावा केल्या. त्याशिवाय मार्के यान्सनने १४ धावांची खेळी केली. आफ्रिकेच्या एकाही फलंदाजाला १५ धावसंख्याही ओलांडता आली नाही. मार्को यान्सनने सर्वाधिक १४ धावांची खेळी केली. क्विंटन डिकॉक, एडन मार्करम, हेनरिक क्लासेन, केशव महाराज, कगिसो रबाडा,एनगिडींना दुहेरी धावसंख्याही गाठता आली नाही.

# एकीकडे समाज कल्याणच्या योजना राबवायच्या; अन् दुसरीकडे या योजनांना 'खो' द्यायचा!

## जिल्हा परिषद समाज कल्याण खात्याचा भोंगळ कारभार

- केंद्र सरकारच्या आर्थिक निधीची शाश्वती नसल्याने दिव्यांग पुनर्वसन केंद्राचा बोजवारा
- केंद्र शासनाच्या जाचक अटींमुळे पुनर्वसन केंद्र प्रस्तावासंदर्भात संस्थांमध्ये उदासिनता

सुराज्य/सोलापूर

**सोलापूर : एकीकडे समाज आणि समाजाच्या सर्वांगीण विकास, समाजाच्या उन्नतीसाठी केंद्र सरकार विविध योजना राबवत आहे. दिव्यांगांसाठी अनेक चांगल्या योजना आहेत. मात्र केंद्र सरकारच्या आर्थिक निधीची शाश्वती नसल्याने नव्याने स्थापित होणाऱ्या दिव्यांग पुनर्वसन केंद्राबाबत अनेक अडचणी आहेत. असे जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर यांनी दैनिक सुराज्य प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.**



दिव्यांग पुनर्वसन केंद्र चालविण्यासंदर्भात अनेक तांत्रिक बाबी आणि त्यातील चालक अटी, नियम-नियमावली, अडी-अडचणी, या योजनेसंदर्भात प्रस्ताविक अर्जदारांचा निरुत्साह, यामुळे जिल्हा परिषद समाज कल्याण खात्याचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर येत आहे.

जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र डीडीआरसी ही केंद्र शासनाची दिव्यांग कल्याण योजना आहे. सदर योजना सोलापूर जिल्ह्यासाठी राबवण्यात येत आहे. ही योजना राबवण्यासाठी राज्य, सोलापूर जिल्ह्यातून दिव्यांग क्षेत्रात कार्य करणाऱ्या व संस्था नोंदणी कायदा १९५० व सार्वजनिजक विश्वस्त अधिनियम १८६० या कायद्याअंतर्गत, दिव्यांग व्यक्ती अधिनियम १९९५ व २०१६ अंतर्गत नोंदणी झालेल्या, दिव्यांग क्षेत्रात पाच वर्षे कार्य करण्याचा अनुभव असलेल्या स्वयंसेवी संस्थाकडून प्रस्ताव मागवण्यात आले होते.

जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र (डीडीआरसी) सुरू करण्यासाठी प्रस्ताव दि. २ नोव्हेंबरपर्यंत जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर या कार्यालयाकडे सादर करण्याचे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर यांनी केले होते. दरम्यान, मुदत संपल्यानंतर जेमतेम एकमेव किंवा तीनच अर्ज दाखल झाल्याचे सांगण्यात आले.

जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र (डीडीआरसी) साठी जाहिरातीद्वारे प्राप्त प्रस्तावातून सुयोग्य अशा एकाच संस्थेची निवड करण्यात येणार असल्याचे वृत्तपत्रात बातमी होती. मात्र त्याचे झाले असे की जाहिरातीद्वारे प्रसिद्धीकरण न देता केवळ वृत्तपत्रात या संदर्भात बातमी देण्यात आली होती. केवळ 'दैनिक सुराज्य' या एकाच वृत्तपत्रातून सदरच्या



प्रस्तावासंदर्भातील बातमी प्रसिद्ध झाली होती. वास्तविकतेत या योजनेबाबत संस्थांचा निरुत्साह असल्याचे दिसत आहे. आर्थिकदृष्ट्या सक्षम, बळकट असलेले संस्था आणि प्रमाणपत्र असलेल्यांनाचा या योजनेची अंमलबजावणी करता येणार असल्याने नियमावलीत न अडकण्यापेक्षा अर्ज न केलेले बसे, अशेच समजावे लागेल.

> जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र चालविण्याससंबंधीच्या प्रस्तावाच्या बातमीसंदर्भात वृत्तपत्रातून आवाहन केले होते. मात्र एकच अर्ज प्राप्त झाल्याचे बांगर यांनी दैनिक सुराज्यच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. दि. २ नोव्हेंबर ही शेवटची तारीख होती. मात्र केंद्र चालविण्यासाठी एकाच संस्थेने प्रस्ताव सादर केल्याचे सांगण्यता आले. बांगर म्हणतात, एकच अर्ज उपलब्ध झाला आहे. दुसरीकडे अधिकारी सुनील खमितकर म्हणतात, दोन अर्ज प्राप्त झाले आहेत. म्हणजे या प्रमुख दोन अधिकाऱ्यांमध्ये सुद्धा एकमत नसल्याचे दिसून येत आहे.
>
> **–सच्चिदानंद बांगर, (दिव्यांग विभाग समाज कल्याण)**

> या दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या अटी आणि शर्ती किचकट असल्याने यामध्ये संस्थांनी इंटरेस्ट दाखवला नाही. पूर्वीचा असा अनुभव असल्याने जिल्ह्यातील अनेक संस्था यात सहभागी झाल्या नाहीत. दिव्यांग पुनर्वसन केंद्रासंबंधी योजना चांगल्या आहेत. परंतु केंद्र सरकार हे पुनर्वसन केंद्र चालविण्यासाठी आर्थिक निधी वेळेवर उपलब्ध करून देत नाही. म्हटले तर त्याची शाश्चतीच दिली जात नाही. त्यामुळे ज्या संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत. अशाच संस्था यात सहभागी होतात. एवढी चांगली योजना असूनसुद्धा आर्थिकदृष्ट्या न परवडणारी असल्याने अनेक संस्था यात इंटरेस्ट दाखवत नाहीत.
>
> **–सुनील खमितकर, (जिल्हा समाज कल्याण)**

## पोस्टमनला नोकरी घालवण्याची धमकी देऊन खंडणी घेतली

**मोहोळ :** पोस्टमन यांना नोकरी घालवण्याची धमकी देऊन त्यांच्याकडून मोबाईलचे हप्ते भरण्यासाठी लावून ५९ हजाराची खंडणी वसूल केल्याची घटना हिवरे (मोहोळ) येथे घडल्याचे नुकतेच उघडकीस आले.

या प्रकरणात मोहोळच्या पोलिसांनी दयानंद राजेंद्र लोंढे (वय-३४, हिवरे, मोहोळ) याला अटक करून तीन दिवसांची पोलिस कोठडी घेतली आहे. यासंदर्भात विलास जनार्धन सुतार (वय ६०) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. सुतार यांच्या परिचयातील आरोपी दयानंद लोंढेने त्यांना तुझी नोकरी घालवतो, अशी धमकी दिली. त्यांच्या नावावर सप्टेंबर २२ मध्ये १ लाख ४७ हजार रुपये किमतीचा मोबाईल घेतला होता. बळजबरीने फायनान्समध्ये प्रत्येकी १५ हजारप्रमाणे ४ हप्ते भरण्यास भाग पाडले. अशा आशयाची फिर्याद सुतार यांनी पोलिसात दिली. पोलिसांनी दयानंद लोंढेला नुकतीच अटक केली. त्याला तीन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने रविवारी दिला. तपास फौजदार कांबळे करीत आहेत.

## अस्मितेच्या प्रश्नांमुळे लोकशाहीचा खेळखंडोबा : मेधा पाटकर

सुराज्य/सोलापूर



अस्तित्वाचे प्रश्न बाजूलाच ठेवून केवळ जाती-धर्माच्या अस्मितेचे प्रश्न पुढे आणले जात असताना नागरिकांना संविधानाने दिलेले मूलभूत अधिकार मिळत नाहीत. बेरोजगारीचा प्रश्न गंभीर होत आहे. त्यातूनच मराठा, धनगर, मुस्लीमच काय, ब्राह्मण समाजासह ज्यांना दलितांमध्ये सामील करून घेतले नाही, असे सर्वच समाज आरक्षण मागत आहे. आरक्षणासाठी शासनाकडून मिळणारे आश्वासन हे केवळ आश्वासनच असते. आरक्षणाच्या रूपाने अस्तित्वाच्या प्रश्नासाठी संघर्षाची लढाई लढावीच लागणार आहे, असे मत ज्येष्ठ सामाजिक नेत्या मेधा पाटकर यांनी व्यक्त केले.

रविवारी त्या सोलापूरच्या दौऱ्यावर आल्या होत्या. सोलापूर श्रमिक पत्रकार संघात एका पत्रकार परिषदेत बोलताना पाटकर यांनी देशातील सध्यस्थितीसह मराठा, धनगर व इतर समाजाकडून आरक्षणासाठी होत असलेल्या आंदोलनावर भाष्य केले. मराठा समाजाने ओबीसीसाठी आणि धनगर समाजाने आदिवासीचा दर्जा मिळण्यासाठी लढतो, त्याबद्दल लक्ष वेधले असता पाटकर म्हणाल्या, देशाचे अंतिम उद्दिष्ट हे जाती निर्मूलनाचे असले पाहिजे. आज प्रत्येक समाजाला आरक्षणाची मागणी करावी लागते. राज्य घटना तयार करताना, सामाजिक आरक्षणाची गरज पुढे १० ते २५ वर्षात पूर्ण झाली पाहिजे, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित होते. पण त्याची अंमलबजावणी नीट झाली नाही. मंडल आयोगाची अंमलबजावणीही पूर्ण झाली नाही. संविधानानुसार सर्व नागरिकांना रेशनपासून ते शिक्षण, आरोग्यापर्यंत सर्व मूलभूत अधिकार अजूनही मिळत नाहीत. खरे तर एक टक्का धनिकांवर दोन टक्के संपत्ती कर लावला तर साडेसात लाख कोटी आणि वारसा हक्काने मिळणा-या मोठमोठ्या संपत्तीवर एकदाच ५० टक्के कर लावल्यास साडेनऊ लाख कोटी असे मिळून १७ लाख कोटी करातून शिक्षण, आरोग्य मोफत मिळण्यासह शेतक-यांच्या शेतीमालाला हमीभाव देता येणे शक्य आहे. देशात आता आयुष्मान कार्ड दिले जाते. परंतु एकदा रूग्ण आजार पडला की आयुष्यमान कार्डाने पाच लाख रूपये खर्ची पडतात. अस्तित्वाचे हे प्रश्न बाजूला पडून जाती-धर्माच्या अस्मितेचे प्रश्न उठवणे हा लोकशाहीचा खेळखंडोबा आहे, अशी प्रतिक्रियाही पाटकर यांनी व्यक्त केली.

## खंडाळीत ट्रॅक्टरखाली चेंगरून दुचाकीस्वाराचा मृत्यू

सुराज्य/वेळापूर

वेगाने जाणाऱ्या ट्रॅक्टरच्या धडकने दुचाकीवरील सख्खे भाऊ चाकाखाली चेंगरले गेले. या अपघातात एका भावाचा जागीच मृत्यू झाला तर दुसरा गंभीर जखमी झाला. हा अपघात खंडाळी (ता.माळशिरस) येथील हॉटेल आईसाहेबसमोर शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडला.

सयाजीराजे समाधान सुर्यवंशी-पराडे (वय-१, बाभुळगाव) असे मयताचे नाव आहे. तो मोठा भाऊ शंभुराजे (वय-२०) सोबत शुक्रवारी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास दुचाकीवरून वेळापूर ते बाबुळगाव येथील घराकडे निघाले होते.

खंडाळी शिवारातील हॉटेल आईसाहेब समोर अनोळखी ऊस वाहतुकीच्या ट्रॅक्टरच्या धडकेने दोघेही खाली कोसळले. त्यावेळी ट्रॅक्टरचे चाक सयाजीराजे सुर्यवंशी पराडे याच्या अंगावरून गेल्याने तो जागीच मयत झाला.

त्याचा भाऊ शंभूराजे हा गंभीर जखमी झाला. याची नोंद वेळापूर पोलिसात झाली. या संदर्भात विजय प्रल्हाद पराडे यांनी वेळापूर पोलिसात फिर्याद दिली. त्याप्रमाणे पोलिसांनी अनोळखी ट्रॅक्टर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

## आईची इच्छा... ...शेवटचे दिवस उरलेत, माझ्यादेखत दादा मुख्यमंत्री व्हावेत

सुराज्य/पुणे



आईची माया किती किती म्हणून सांगायची.सारी लेकरे तिला समान. आईची इच्छा काय असणार? माझा परिवार सुखी असावा.पण एका मातेने वेगळीच इच्छा व्यक्त आहे. त्या आहेत,राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मातोश्री.माझे आता शेवअचे दिवस उरले आहेत.माझ्या डोळ्या देखत दादा मुख्यमंत्री व्हायला हवेत,अशी इच्छा त्यांनी बोलून दाखवल्याने राज्याच्या राजकारणात पुन्हा वेगळीच चर्चा रंगली आहे.

झाले असे की-बारामती तालुक्यातील काटेवाडी हे अजित पवारांची जन्मभूमी.काटेवाडी ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी रविवारी मतदान झाले. दादा हे आजारी असल्याने त्यांच्या मातोश्री आशाताई यांनी निवडणुकीची धुरा सांभाळली होती.तिथे भाजप,अजित पवार या दोन गटात चुरशीची लढत आहे.आशाताई दिवसभर तिथे तळ ठोकून होत्या. यावेळी आशाताईंनी सर्वप्रथम मतदानाचा हक्क बजावला. त्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. त्यांनी अजितदादा मुख्यमंत्री व्हावेत, अशी इच्छा बोलून दाखवली. त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकिय वर्तुळात पुन्हा एकदा दादांच्या मुख्यमंत्रीपदाची चर्चा सुरु होण्याची शक्यता आहे. अजित पवार हे डेंग्यूने आजारी आहेत.अद्यापही त्यांच्या अंगात अशक्तपणा असल्यामुळे ते काटेवाडी ग्रामपंचायतीच्या मतदानासाठी येऊ शकले नाहीत. मात्र, त्यांची उणीव भरुन काढण्यासाठी अजितदादांच्या पत्नी सुनेत्रा पवार, मातोश्री आशाताई पवार काटेवाडीतील मतदान केंद्रावर दाखल झाल्या.

### लोकांचे प्रेम आहे...

यावेळी आशाताई पवार यांना अजितदादांच्या मुख्यमंत्रीपदाबाबत प्रतिक्रिया विचारण्यात आली असता त्यांनी कोणताही आडपडदा न ठेवता आपली इच्छा स्पष्टपणे बोलून दाखवली. दादाने माझ्यादेखत मुख्यमंत्री व्हावे, असे वाटते. दादावर लोकांचे प्रेम आहे, पण पुढचे काय सांगता येते? सर्वांना वाटते की, दादाने मुख्यमंत्री व्हावे. आता शेवटच आहे, मी आता ८६ वर्षांची आहे. त्यामुळे माझ्यादेखतच मुलाने मुख्यमंत्री व्हावे, असे वाटते. कोणास ठाऊक इच्छा पूर्ण होईल की नाही. लोकांचे काय सांगता येते?, असे आशाताई म्हणाल्या.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



इतक्या वर्षापासून चिंचोळी एमआयडीसी नाव कधी कानावर नाही आलं!

## 'धिप्पाड कोब्रा'वर विक्रमी बोली

## अकलूजनगरीत नखरेल अश्वांची अनोखी ऐट

सुराज्य/अकलूज



नखरेल अश्वांचे अनोखे नखरे आणि ऐट पुन्हा अकलूजच्या घोडेबाजारात पाहायला मिळू लागली आहे. घोडेबाजाराच्या उद्घाटनापूर्वीच एक कोटी रुपयांच्या अश्वांची विक्री झाल्याने यंदाचा घोडेबाजार विक्रमी भरणार अशी चिन्हे आहेत. यंदा या घोडेबाजारात काळा-कुळकुळीत धिप्पाड कोब्रा या अश्वाचा बोलबाला असून त्याला सुरुवातीलाच ५० लाखांची बोली लागली आहे.

दिवाळी पाडव्यादिवशी दरवर्षी या अकलूजच्या घोडेबाजाराचा शुभारंभ होत असतो. मात्र यंदा आधीपासूनच देशभरातून दर्जेदार घोडे दाखल झाल्याने या बाजाराचा शुभारंभ होण्याअगोदरच एक कोटी रुपयांच्या घोड्यांची विक्री झाली आहे. यावर्षीचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे यंदा दक्षिण भारतातून मोठ्या प्रमाणात खरेदीदार आले असून ठिकठिकाणी हे लुंगीवाले घोड्यांची पारख करताना दिसत आहेत.

घोडेबाजार हे पहिल्यापासून सर्वांचेच आकर्षणाचे केंद्र राहिल्याने घोडेबाजारात हौशी लोकांची गर्दी असतेच पण घोडे शौकीन आणि खरेदीदारांसाठी देखील ही पर्वणी असते. यंदा बाजारात पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार, दिल्ली या भागातून तब्बल ११०० दर्जेदार अश्व उद्घाटनापूर्वीच दाखल झाले आहेत. यावर्षी बरेली येथून आलेला कोब्रा हा साडेतीन वर्षाचा अश्व सध्या सर्वांचा चर्चेचा विषय ठरला आहे. मारवाड जातीचा तेलिया कुंमेत प्रकारच्या या अश्वाची उंची ६३ इंच इतकी असून याला धरायला दोन अश्व रक्षक लागतात इतका हा ताकतवान अश्व आहे. अतिशय देखणा असणाऱ्या या 'कोब्रा'ला चांगले प्रशिक्षणही दिले गेले आहे. त्याची ऐटबाज चाल आणि देखणेपणावर अश्व शौकीन फिदा होताना दिसत आहेत.

तर याच जोडीच्या प्रिन्स या पंजाबी अश्वाला ३० लाख रुपयाला मागणी झाली आहे. रंगाने पांढराशुभ्र , चमकदार डोळे, रुंद पाठ आणि ऐटबाज देखण्या प्रिन्स याचाही मोठा रुबाब आहे. हलग्याचा कडकडाट सुरु होताच पायात घुंगरू बांधून नाचणारा प्रिन्स मधूनच दोन पाय उंच करून दोन पायावर नाचत पुढे येत असतो. यंदा त्यामुळेच अकलूज बाजारात असणारे दर्जेदार अश्व खरेदीसाठी तामिळनाडू, कर्नाटक, केरळ, आंध्र प्रदेश, तेलंगणा येथून मोठ्या संख्येने अश्व शौकीन अकलूजमध्ये दाखल झाले आहेत.

### देशातील मुख्य घोडेबाजार...

कार्तिक यात्रेनंतर अकलूज मधील भरणारा घोडेबाजार हा आता देशातील मुख्य घोडेबाजारात गणला जाऊ लागला आहे. अकलूज बाजारात उंची किमतीचे दर्जेदार घोड्यांची विक्री मोठ्या प्रमाणात होत असल्याने खास अकलूज बाजारासाठी अनेक व्यापारी ठेवणीतले घोडे विक्रीस आणत असतात. या बाजारात ५० हजारापासून ५० लाखापर्यंत घोड्यांच्या किमती असून यात पंचकल्याणी, नुखरा, अबलख, काटेवाडी, पंजाबी, मारवाड, सिंध अशा विविध प्रकारच्या अश्वांना पाहण्यासाठी देशभरातून खरेदीदार आणि घोडे शौकीन मोठ्या प्रमाणात दाखल होऊ लागले आहेत. यात ६ महिन्यापासून एक वर्षापर्यंतच्या दर्जेदार घोड्यांच्या पिल्लांची किंमत सध्या जास्त असली तरी त्यांनाच मोठ्या प्रमाणात मागणी केली जात आहे.